# <u>लोकपालांच्या नियुक्तीचा हा मार्ग नाही.</u>

**अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

लोकपाल आणि लोकायुक्त अधिनियम, 2013 ला 46 वर्षाआधी खुप विचार-विनिमय केल्यानंतर लागू करण्यात आले. संस्थानांना बनविणे एक आव्हानात्मक कार्य आहे. लोकपालाचे चार न्यायिक सदस्य आणि चार गैर न्यायिक सदस्यांच्या एका नियुक्तीमध्ये विश्वसनीयता, योग्यता आणि निष्पक्षतेला लक्षात घेतले पाहिजे. मोठी खेदजनक गोष्ट आहे की, युपीए सरकार निवडणूकीच्या आधी नियुक्ती करण्यासाठी खुप आतुर आहे. यासाठी ती प्रक्रीयेला लहान करण्यासाठी धडपडत आहे त्यामुळे नियुक्ती केली जाऊ शकते. या प्रक्रियेत विधी संबंधी प्रावधान आणि त्याच्या औचित्याचे उल्लंघन केले गेले आहे.

**1.अधिनियमाची धारा 4 (4) चे उल्लंघनः**

अधिनियमाची धारा 4(4)मध्ये तरतूद आहे की, चयन समितीला लोकपालाचे चेयर पर्सन आणि सदस्यांची निवड करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणावी लागेल. निवड समितीची फक्त एकदा 21 फेब्रुवारी 2014 रोजी बैठक झाली. त्या बैठकीत माझ्या मते चौकशी समितीच्या सदस्यांची निवड करण्यात आली. निवडीची प्रक्रीया निवड समिती द्वारे करण्याऐवजी कार्मिक प्रशिक्षण विभागाने 17 जानेवारी 2014 ला एक जाहीरात काढली म्हणजे त्यादिवशी निवड समिती स्थापित करण्यात आली नव्हती, ज्यात लोकपालाच्या न्यायिक आणि गैर न्यायिक सदस्यांच्या नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात आले होते. मी पंतप्रधानांना 20 जानेवारी आणि 30 जानेवारी 2014 ला यासंदर्भात पत्र लिहिले होते. तथापि मला पंतप्रधानांची दोन उत्तरे मिळाली मात्र त्यात माझ्या प्रमुख चिंतेला दूर करण्यात आले नव्हते. इतपत की अधिनियमाच्या अंतर्गत कार्मिक प्रशिक्षण विभागाची कोणती भुमिका नाही आहे, त्यांनी स्वतःच्या भुमिकेसाठी नियम बनविले आहेत. अधिनियमाच्या अंतर्गत, ती भुमिका निवड समिती आणि स्क्रीनिंग कमिटीची आहे. याप्रकरणी दोघांमधून कोणाचीही जाहिरात जारी करणे अथवा अर्ज मागविणे अथवा अर्जदारांना शॉर्ट लिस्ट करण्यात कोणतीही भुमिका नाही आहे.

**2.पदासाठी योग्य लोकांकडून अर्जाची अपेक्षा करणेः**

पंतप्रधानांना 20 जानेवारी,2014 ला लिहिलेल्या माझ्या पत्रात मी लिहिले होते की, सर्वोच्च न्यायालयातून सेवानिवृत्त होणारा अथवा वर्तमान न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या नियुक्तीसाठी अर्ज केल्यास त्या पदाच्या प्रतिष्ठेचा प्रश्नं उद्भवतो. सेवानिवृत्त न्यायाधीश जे आपला सीवी घेऊन संस्थेसोबत लॉबींग करतील ते आपल्या आत्मसन्मान आणि प्रतिष्ठे सोबत समझोता करतील. असे होऊ शकते की, नोकरी शोधत असलेला न्यायाधीश लोकपालाचे सदस्य म्हणून नियुक्त होणारा सर्वश्रेष्ठ व्यक्ति नसेल. कोणत्याही परिस्थितीत अर्ज मागविले पाहिजेत अथवा नाही, यासंदर्भात निर्णय निवड समितीने घेतला पाहिजे. सरकार पुढे गेली तिने 7 फेब्रुवारी 2014 रोजी अर्ज मागविले. मला या तथ्याची माहिती आहे की अनेक वर्तमान न्यायाधीशांनी अर्ज करण्यास नकार दिला कारण त्यांचे म्हणणे होते की त्यांना आपला आत्मसन्मान आणि प्रतिष्ठे सोबत समझोता करावा लागेल. मात्र काहींनी आपल्या मुख्य न्यायाधीशांकडे अर्ज पाठविले जे ते यावर विचार करण्यासाठी पुढे पाठवू शकतील. जाहीरातीच्या पॅरा 15 मध्ये वर्तमान न्यायाधीशांकडून अपेक्षा केली गेली आहे की, ते आपले कार्य अनुभव आणि अन्य वैशिष्ट्यांसह सीवी विस्तृत टिप्पणी सोबत जोडावे. पॅरा 16 मध्ये न्यायाधीशांकडून अपेक्षा केली गेली आहे की, त्यांनी या गोष्टीचे तर्कसंगत स्पष्टीकरण द्यावे की ते कशा प्रकारे त्या पदाची पात्रता पूरी करु शकतील ज्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे. या तर्काला 200 शब्दात लिहावे लागेल. ही प्रक्रिया कोणी ठरवली?निश्चितपणे ही निवड समिती अथवा चौकशी समितीची नाही तर कार्मिक प्रशिक्षण विभागाच्या प्रभारी मंत्र्याचे काम आहे. या अधिनियमाच्या अंतर्गत त्यांची कोणतीही भुमिका नाही. मात्र या विभागाने आपल्यासाठी भुमिका हडप केली आहे.

**3.चौकशी समितीची काम करण्याची स्वाधीनता कार्मिक विभागाने कमी केली आहेः**

जे नियम बनविण्यात आले आहे ते अधिनियम कायदयाच्या ताकतीपेक्षा वेगळे आहेत. अधिनियम 10 मध्ये सांगण्यात आले आहे की कार्मिक प्रशिक्षण विभाग, भारत सरकार द्वारे देण्यात आलेल्या लोकांच्या सूचीमध्ये चौकशी समितीने नावांचा एक पॅनेल तयार करावा ज्यावर निवड समितीला विचार करवा लागेल. अर्जकर्त्यांपैकी शॉर्ट लिस्ट कार्मिक प्रशिक्षण विभाग करेल. चौकशी समितीची काम करण्याची स्वाधीनता कमी करण्यात आली आहे.

मिडीयातून आम्हाला माहिती मिळाली आहे की चौकशी समितीचे प्रमुख सदस्यांपैकी एक श्री फली एस नारीमन यांनी चौकशी समितीत राहण्याचा सन्मान ठोकरला आहे. जाहिर आहे की कोणतीही

स्वाभिमानी व्यक्ती रबर स्टँप बनणार नाही. सरकारने चौकशी समितीमध्ये आपले समर्थक भरण्याचा निर्णय घेतला आहे. चौकशी समितीसाठी ज्या नावांची सूचना करण्यात आली आहे त्यांत सरकारी वकिलांची नावे शामिल आहेत. तथापि कायदा परिवारातील फक्त सरकारी वकिल आणि मिडीया मधून वास्तविक कॉंग्रेसच्या एका प्रवक्त्याचे नाव चौकशी समितीसाठी प्रस्तावित केले आहे. श्रीमती सुषमा स्वराज या नावांवर सहमत नव्हत्या. सरकारला ही जाणीव असली पाहिजे की कोणतेही संस्थान कोणत्या राजकीय पक्षाचे असू शकत नाही. आपण जितके निष्पक्ष आणि विश्वसनीय संस्थान बनविणार, ते व्यवस्थेसाठी चांगले असेल. चौकशी समितीला प्रभावहीन बनविणे अथवा लोकपालाला मित्रवत नावांनी भरण्याने संस्थानाच्या हितांना साधले जाऊ शकत नाही. युपिएने सीबीआय, सीएजी, पीएसी, जेपीसी आणि सीवीसीला खुप नुकसान पोचवले आहे. मला अपेक्षा आहे की लोकपाल या आक्रमणातून वाचेल.